Cosmos Multidisciplinary Research E-Journal Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal Impact Factor 4.94 ISSN No. 2456-1665

# वंचित उपेक्षित मराठवाडा: एक अभ्यास

**प्रा. डॉ शाम कदम**
विभाग प्रमुख राज्यशास्त्र विभाग
देवगिरी महाविद्यालय औरंगाबाद.
drshyamkadam@gmail.com

**प्रस्तावना**

मराठवाडा हैदराबादच्या निजाम राजवटीपासून स्वतंत्र होऊन 74 वर्ष पूर्ण झाली मागे वळून पाहतांना मराठवाड्याचे मागासलेपण सहज दिसून येते ब्रिटिशांच्या वर्चस्वाखालील प्रदेशात ज्याप्रमाणे आधुनिकतेचीमूल्ये, संचार साधने, दळणवळणाचे मार्ग, औद्योगीकरण, आणि शिक्षणाची वारे(शिक्षण संस्था) होते ते मराठवाड्यात खूप उशिरा पोहोचले. इतर सुविधांचा वनवा होता शेतीपूरक धोरणांचा, औद्योगिक विकासाचा लवलेशही नव्हता निजामाच्या पाडावानंतर मराठवाडा विभाग विनाअट संयुक्त महाराष्ट्रात सामील झाला.



अशी ऐतिहासिक पार्श्वभूमी असलेला मराठवाडा शेती विकास, पीक पद्धतीतील नियोजन, जमीन सुधारणा, हरित क्रांति, पाणी साठे निर्मिती, पाणी साठी नियोजन, नैसर्गिक साधन संपत्ती, औद्योगिक विकास इत्यादी सर्व गोष्टींमध्ये आजही खूप मागे आहे हे प्रश्न गेली 74 वर्षांपासून

सोडवण्यात आले नाहीत. संयुक्त महाराष्ट्राच्या राज्यकर्त्यांनी अद्याप पर्यंत मराठवाडा वंचित उपेक्षितच ठेवला आहे मराठवाडा आजही मागासलेलाच आहे आणि आणखी किती वर्ष हा विभाग वंचित उपेक्षित राहणार आहे हा एक मोठा प्रश्न आहे.

**राजकीय नेतृत्वाची उदासीनता:**

मराठवाड्यातील जवळपास 90 टक्के नेतृत्व खाजगी आणि सार्वजनिक सभेत स्वतःचा वारसा आणि व्यवसाय शेती असल्याचे सांगत असतात पण शेतकऱ्यांच्या हिताचे प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न करत नाहीत.विदर्भापेक्षाही मराठवाड्यातील शेतकरी आत्महत्येचे प्रमाण आज वाढलेलं आहे. आतापर्यंत शेती विकासाचे आणि शेतमालाला हमी भाव मिळवून देण्याचे प्रयत्न झाले नाहीत मोठ्या प्रकल्पांच्या परिसरात पश्चिम महाराष्ट्रातील सहकार क्षेत्राचे अनुकरण करत साखर कारखाने काढले गेले पण दुष्काळी स्थितीत अनेक साखर कारखाने बंद ठेवावे लागतात.आता मराठवाड्यातील एकही साखर कारखाना सुरळीत आणि नफ्यात चालत नाही. शेतीवर आधारित इतर उद्योग व्यवसाय, शेती पूरक जोड व्यवसाय, शेतीमाल प्रक्रिया उद्योग, शेती पूरक उद्योग क्षेत्र आदींचा विकास करण्यात आला नाही. याशिवाय ग्रामीण सहकारी बँक सोसायट्या सुरू केल्या पण अपवादात्मक वगळता सर्वच सहकारी संस्था तोट्यात किंवा बुडित निघण्याच्या मार्गावर आहेत. मराठवाड्यातील सर्वच जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका या तर गॅस वर आहेत. एकाही जिल्ह्यातील सहकारी बँक सुव्यवस्थित व्यवहार करणारी नाही.

कोरडवाहू शेती विकासाचा प्रयत्न एकाही राजकीय नेतृत्वाने केला नाही परिणामी मराठवाड्यातील शेतीक्षेत्र मागासलेले राहिले आहे मराठवाड्यातील राजकीय नेतृत्वाने शेती विकासासाठी व्यावहारिक पातळीवर नवनवीन प्रयोग करायला हवे होते. तसेच शेतीला जोड व्यवसाय असणारे विकास करणे गरजेचे होते मराठवाडा विभाग पूर्णतः शेतीवर अवलंबून असणारा विभाग आहे. तरी याबाबत राजकीय नेतृत्वाने मोठ्या प्रमाणात आजतागायत उदासीनता दाखवली आहे परिणामतः मराठवाडा मागास राहिला आहे.

**प्रादेशिक असमतोल:**

महाराष्ट्रातील विभाग निहाय विकासाच्या असमतोलाचे मोजमाप करून अनुशेष निश्चितीचे काम अनुशेष निर्देशांक समितीने 1994 सालाची आकडेवारी घेऊन 24 वर्षांपूर्वी केले होते व त्याच्याच आधारावर आताही राज्यपाल विकास निधीचे वाटप करीत आहेत. फार वर्षांपूर्वी च्या निकषावरच आजही वाटप करून मराठवाड्यावर फार मोठा अन्याय केला जात आहे. महाराष्ट्रातील प्रादेशिक असमतोल कमी होण्याऐवजी वाढतच गेला आहे आणि तो कमी करन्याचे प्रामाणिक प्रयत्न केले गेले नाहीत. वैधानिक विकास महामंडळ असूनही त्याला पुरेसा निधी दिला जात नाही. परिणामी मराठवाड्याचा विकास संथगतीने चालू आहे त्या तुलनेत पश्चिम महाराष्ट्र कित्येक पटीने अग्रेसर होत गेला आहे.

**थोडक्यात:**

मराठवाडा ऐतिहासिक दृष्टीने तर मागास होताच तो आज वंचित उपेक्षित पण आहे राजकीय नेतृत्वाने आता तरी मराठवाड्यावरील अन्याय दूर करण्याचे प्रामाणिक प्रयत्न करणे गरजेचे आहे. मराठवाड्याचा निधी त्याला पूर्णतः मिळालाच पाहिजे औद्योगिकरणास चालना देऊन येथील शेतीपूरक व्यवसायाला प्रोत्साहन देऊन भांडवल देखील उपलब्ध करून देणे गरजेचे आहे. मराठवाडा शेतीवर पूर्णतः अवलंबून असल्यामुळे आणि ही शेती कोरडवाहू असल्यामुळे तोट्यात आहे परिणामी मराठवाड्यात शेतकरी आत्महत्येचे प्रमाण देखील दिवसेंदिवस खूप वाढलं आहे.

**संदर्भ;**

1) दैनिक सकाळ, सप्तरंग लेखन मालिका, 17 सप्टेंबर, 2020.
2) दैनिक दिव्य मराठी, संपादकीय, 20 डिसेंबर, 2011
3) पेंडसेलालजी,"संयुक्त महाराष्ट्राचे महामंथन" मुंबई, 2010
4) महाराष्ट्राच्या समतोल प्रादेशिक विकासाच्या प्रश्नावरील उच्च समितीचा अहवाल, नियोजन विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई, 2013
5) दैनिक महाराष्ट्र टाइम्स, संपादकीय, 18 सप्टेंबर, 2018